सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

## सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९

# महाराष्ट्र प्राणिरक्षण अधिनियम, १९७६

(दिनांक ३ जुलै, २००६ पर्यंत सुधारित)

# THE MAHARASHTRA ANIMAL PRESERVATION ACT, 1976

*(As modified upto 3rd July 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि
संचालक, मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

**२००६**

[ **किंमत :** रुपये ४-००]

# महाराष्ट्र प्राणिरक्षण अधिनियम, १९७६

## अनुक्रमणिका


उद्देशिका.

**कलमे.**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती.

२. राज्याच्या धोरणाची घोषणा

३. व्याख्या.

४. सक्षम प्राधिकरणाची नेमणूक.

५. गायींची कत्तल करण्यास मनाई.

६. अनुसूचित प्राण्यांच्या कत्तलीवरील निर्बंध.

७. अनुसूचित प्राण्यांची फक्त विनिर्दिष्ट ठिकाणी कत्तल करणे.

८. जागेत प्रवेश करण्याचा व जागेची तपासणी करण्याचा अधिकार.

९. शास्ती.

१०. या अधिनियमाखालील अपराध दखलपात्र असणे.

११. अपप्रेरणा व प्रयत्न.

१२. या अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करणाऱ्या व्यक्ती या लोकसेवक असल्याचे मानणे.

१३. या अधिनियमाखाली किंवा नियमांखाली सद्भावपूर्वक कृती करणाऱ्या व्यक्तींचे संरक्षण.

१४. या अधिनियमाखालील सूट.

१५. अधिकारांचे प्रत्यायोजन.

१६. नियम तयार करण्याचा अधिकार.

१७. निरसन व व्यावृत्ती.

**अनुसूची.**



(शा.म.मु.) उच्च १५७८-१ (६०६७-११-०६)

# सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९[१].

[ महाराष्ट्र प्राणिरक्षण अधिनियम, १९७६ ]

[ राष्ट्रपतींची संमती १६ फेब्रुवारी, १९७७ रोजी मिळाली ; राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक १ मार्च, १९७७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

**गायींची कत्तल करण्यास मनाई करण्याची आणि दुधासाठी, पैदाशीसाठी, ओझी वाहण्याच्या कामासाठी किंवा शेतीविषयक प्रयोजनांसाठी उपयुक्त असलेल्या इतर विवक्षित प्राण्यांचे रक्षण करण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** गायींची कत्तल करण्यास मनाई करण्याची व दुधासाठी, पैदाशीसाठी, ओझी वाहण्याच्या कामासाठी किंवा शेतीविषयक प्रयोजनांसाठी उपयुक्त असलेल्या इतर विवक्षित प्राण्यांचे रक्षण करण्याची तरतूद करणे व त्याच्याशी संबंधित बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र प्राणिरक्षण अधिनियम, १९७६ असे म्हणता येईल.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा दिनांकास अंमलात येईल.

(४) तो, गायींना आणि अनुसूचीतील प्राण्यांना लागू होईल.

राज्याच्या धोरणाची घोषणा.

**२.** याद्वारे असे घोषित करण्यात येते की, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ४८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तत्त्वांचे पालन होण्याकरिता राज्याचे धोरण अंमलात आणण्यासाठी हा अधिनियम आहे.

व्याख्या.

**३.** या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर,—

(क) " सक्षम प्राधिकरण " याचा अर्थ या अधिनियमाखालील सक्षम प्राधिकरणाची कामे पार पाडण्यासाठी राज्य शासनाने कलम ४ अन्वये नेमलेली व्यक्ती किंवा व्यक्तींची संस्था, असा आहे ;

(ख) " गाय " या संज्ञेमध्ये कालवडीचा (हेफरचा) किंवा पाड्याचा किंवा पाडीचा समावेश होतो ;

(ग) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(घ) " अनुसूची " याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची, असा आहे ;

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र** (इंग्रजी), १९७६, भाग चार, असाधारण, दिनांक ६ डिसेंबर, १९७६ याचे पृष्ठ ६७९ पहा.

(ङ) " अनुसूचित प्राणी " याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही प्राणी, असा आहे ; आणि राज्य शासनास कोणत्याही जातीच्या प्राण्यांच्या रक्षणाची आवश्यकता विचारात घेतल्यानंतर **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूचीमध्ये प्राण्यांच्या त्या जातीची भर घालता येईल ; आणि कलम १६, पोट-कलम (३) ची तरतूद राज्य विधानमंडळापुढे मांडणे व राज्य विधानमंडळाकडून फेरबदल होणे याच्याशी ते संबंधित असतील तेथवर, त्या कलमाखाली केलेल्या कोणत्याही नियमाला ज्याप्रमाणे ते लागू होतात त्याचप्रमाणे अशा अधिसूचनेला लागू होतील.

सक्षम प्राधिकरणाची नेमणूक.

४. राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाखालील सक्षम प्राधिकरणाची कामे पार पाडण्यासाठी एका अथवा अधिक व्यक्तींची किंवा, व्यक्तींच्या एका किंवा अधिक संस्थांची नेमणूक करता येईल आणि अशी कामे ती/त्या ज्या क्षेत्रांमध्ये पार पाडील/पाडतील ती क्षेत्रे विनिर्दिष्ट करता येतील.

गायींची कत्तल करण्यास मनाई.

५. त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी किंवा एतद्विरुद्ध कोणताही परिपाठ किंवा रुढी असली तरी कोणतीही व्यक्ती, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही गायींची कत्तल करणार नाही किंवा कतल करविणार नाही किंवा कत्तलीसाठी गाय देऊ करणार नाही.

अनुसूचित प्राण्यांच्या कत्तलीवरील निर्बंध.

६. (१) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी किंवा एतद्विरुद्ध कोणताही परिपाठ किंवा रुढी असली तरी, कोणतीही व्यक्ती, तिने कोणत्याही अनुसूचित प्राण्याच्या बाबतीत तो प्राणी कत्तलीस योग्य असल्याबद्दल सक्षम प्राधिकरणाकडून लेखी प्रमाणपत्र मिळवलेले असल्याखेरीज, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही ठिकाणी अशा प्राण्याची कत्तल करणार नाही किंवा कत्तल करविणार नाही.

(२) सक्षम प्राधिकरणाच्या मते,—

(क) अनुसूचित प्राणी.—मग तो नर असो किंवा मादी असो—ओझी वाहण्याच्या प्रयोजनासाठी, किंवा कोणत्याही प्रकारच्या शेतीकामासाठी किफायतशीर असेल किंवा किफायतशीर होण्याची शक्यता असेल ;

(ख) अनुसूचित प्राणी, नर असेल तर, पैदाशीच्या प्रयोजनासाठी किफायतशीर असेल किंवा किफायतशीर होण्याची शक्यता असेल ;

(ग) अनुसूचित प्राणी, जर मादी असेल तर, दूध देण्याच्या किंवा गाभण राहण्याच्या प्रयोजनासाठी किफायतशीर असेल किंव किफायतशीर होण्याची शक्यता असेल ; तर पोट-कलम (१) अन्वये असे कोणतेही प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

(३) राज्य शासनास, सक्षम प्राधिकरणाच्या, या कलमाखालील कोणतेही प्रमाणपत्र देण्याचे नाकारणाऱ्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीकडून असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत अर्ज आल्यावर किंवा कोणत्याही वेळी स्वाधिकारे, या कलमाखालील सक्षम प्राधिकरणाच्या आदेशाच्या कायदेशीरपणाबद्दल किंवा योग्यतेबद्दल स्वतःची खात्री करून घेण्यासाठी, कोणत्याही वेळी, त्या प्रकरणाचा अभिलेख मागविता येईल व त्याची तपासणी करता येईल आणि त्या संदर्भात, त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

(४) या कलमाखालील प्रमाणपत्र हे, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशी फी दिल्यानंतर देण्यात येईल.

(५) पोट-कलम (३) च्या तरतुदींस अधीन राहून, सक्षम प्राधिकरणाने प्रमाणपत्र देणारा किंवा ते देण्याचे नाकारणारा जो कोणताही आदेश दिला असेल तो आदेश आणि पोट-कलम (३) खाली राज्य शासनाने दिला असेल असा कोणताही आदेश अंतिम असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद करता येणार नाही.

अनुसूचित प्राण्यांची फक्त विनिर्दिष्ट ठिकाणी कत्तल करणे.

**७.** ज्यांच्या बाबतीत कलम ६ खाली प्रमाणपत्र देण्यात आले असेल अशा कोणत्याही अनुसूचित प्राण्यांची कत्तल, राज्य शासन त्याबाबतीत नियुक्त करील अशा प्राधिकरणाने किंवा प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणाखेरीज अन्य कोणत्याही ठिकाणी करण्यात येणार नाही.

जागेत प्रवेश करण्याचा व जागेची तपासणी करण्याचा अधिकार.

**८.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, सक्षम प्राधिकरणास किंवा त्याबाबतीत सक्षम प्राधिकरणाने लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस (यात यापुढे जिचा निर्देश " प्राधिकृत व्यक्ती " असा करण्यात आला आहे) ज्या ठिकाणी या अधिनियमाखालील अपराध घडला आहे किंवा घडण्याचा संभव आहे असे सक्षम प्राधिकरणाला किंवा प्राधिकृत व्यक्तीला सकारण वाटत असेल अशा कोणत्याही ठिकाणी प्रवेश करण्याची व त्या जागेची तपासणी करण्याचा अधिकार असेल.

(२) अशा कोणत्याही जागेचा भोगवटा करणारी प्रत्येक व्यक्ती, सक्षम प्राधिकरणाला किंवा प्राधिकृत व्यक्तीला पूर्वोक्त प्रयोजनासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे जागेमध्ये प्रवेश करू देईल आणि सक्षम प्राधिकरणाकडून किंवा प्राधिकृत व्यक्तींकडून तिला विचारण्यात येईल अशा कोणत्याही प्रश्नाचे आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे उत्तर देईल.

शास्ती.

**९.** जो कोणी, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचा भंग करील त्यास, अपराधसिद्ध झाल्यानंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल अशा कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असेल अशा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

या अधिनियमाखालील अपराध दखलपात्र असणे.

१९७४ चा २. **१०.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील सर्व अपराध हे दखलपात्र असतील.

अपप्रेरणा व प्रयत्न.

**११.** जो कोणी, या अधिनियमाखाली शिक्षेस पात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधास अपप्रेरणा देईल किंवा असा कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न करील त्याने तो अपराध केला आहे असे समजण्यात येईल आणि त्यास दोषी ठरविण्यात आल्यानंतर अशा अपराधाबद्दल, या अधिनियमाच्या कलम ९ मध्ये तरतूद केलेली शिक्षा देण्यात येईल.

या अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करणाऱ्या व्यक्ती या लोकसेवक असल्याचे मानणे.

१८६० चा ४५. **१२.** या अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करणाऱ्या सर्व व्यक्ती या भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

या अधिनियमाखाली किंवा नियमांखाली सद्भावपूर्वक कृती करणाऱ्या व्यक्तींचे संरक्षण.

**१३.** या अधिनियमाखाली किंवा तदन्वये केलेल्या नियमांखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कोणतीही कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

या अधिनियमाखालील सूट.

**१४.** याबाबतीत विहित केलेल्या कोणत्याही शर्तीस अधीन राहून, हा अधिनियम, पुढील गोष्टींस लागू होणार नाही :—

(क) राज्य शासनाने स्थापन केलेल्या, चालविलेल्या किंवा मान्यता दिलेल्या कोणत्याही परिसंस्थेमध्ये लशीसाठी (vaccine) लसिकेसाठी (lymph) किंवा रक्तजलासाठी (serum) उपयोगात आणण्यात आलेला (गायीखेरीज) कोणताही प्राणी ;

(ख) खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या परिसंस्थेमध्ये कोणत्याही प्रयोगाच्या किंवा संशोधनाच्या प्रयोजनासाठी शस्त्रक्रिया करण्यात आलेला (गायीखेरीज) कोणताही प्राणी ;

(ग) पुढीलपैकी (गायीखेरीज) कोणताही प्राणी किंवा प्राण्यांचा वर्ग :—

(एक) सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने ज्याची कत्तल करणे आवश्यक आहे असा दाखला राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या पशुशल्यचिकित्सकाकडून देण्यात आला असेल असा प्राणी ;

(दोन) जो रोग सांसर्गिक व इतर प्राण्यांना धोकादायक असल्याचे अशा पशुशल्यचिकित्सकाकडून प्रमाणित करण्यात आले असेल असा कोणताही रोग जडलेला प्राणी :

परंतु असे की, या पोट-कलमामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही प्राण्याच्या कत्तलीसाठी सक्षम प्राधिकरणाकडून लेखी प्रमाणपत्र मिळविण्यात आल्याखेरीज, अशी कत्तल करण्यात येणार नाही किंवा करविण्यात येणार नाही.

अधिकारांचे प्रत्यायोजन.

**१५.** राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,—

(क) कलम ४ खालील आपले अधिकार व कामे कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास, अशा स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेच्या अधीन राहून, स्थानिक क्षेत्रापुरत्या, प्रत्यायोजित करता येतील ;

(ख) कलम ६, पोट-कलम (३) खालील आपले अधिकार व कामे राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास प्रत्यायोजित करता येतील.

नियम तयार करण्याचा अधिकार.

**१६.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे व पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, नियम तयार करता येतील.

(२) विशेषकरून आणि पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमात पुढील गोष्टींसाठी तरतूद करता येईल,—

(क) कलम ६ खालील प्रमाणपत्राचा नमुना,

(ख) अशा प्रमाणपत्रासाठी द्यावयाच्या फी ची रक्कम,

(ग) कलम १४ खालील कोणत्याही अनुसूचित प्राण्यास ज्या शर्तींच्या अधीन राहून, अधिनियम लागू होणार नाही त्या शर्ती,

(घ) विहित केलेली किंवा विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून, यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

१९४८ चा मुंबई ८१. १९५४ चा मुंबई ७२. १९४९ चा मध्यप्रांत व वऱ्हाड ५२. १९५० चा हैद्राबाद ७.

**१७.** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, पुढील अधिनियम निरसित होतील, जसे— निरसन व व्यावृत्ती.

(१) मुंबईचा जनावरांची जोपासना करण्याबाबत अधिनियम, १९४८ ;

(२) मुंबईचा जनावरांची जोपासना करण्याबाबत अधिनियम, १९५४ ;

(३) मध्यप्रांत व वऱ्हाडचा जनावरांची जोपसना करण्याबाबत अधिनियम, १९४९, आणि

(४) हैद्राबाद (जनावरांची कत्तल करणे) अधिनियम, १९५० :

परंतु, अशा निरसनामुळे,—

(क) अशा प्रकारे निरसित झालेल्या कोणत्याही अधिनियमाचे पूर्वप्रवर्तन किंवा त्यान्वये यथोचितरित्या करण्यात आलेली किंवा सोसलेली कोणतीही गोष्ट ;

(ख) अशा रितीने निरसित झालेल्या अधिनियमान्वये संपादित केलेला, उपार्जित केलेला कोणताही अधिकार, विशेषाधिकार, क्रिंवा पत्करलेले आबंधन किंवा दायित्व ;

(ग) अशा प्रकारे निरसित झालेल्या कोणत्याही अधिनियमाविरुद्ध करण्यात आलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात देण्यात आलेली कोणतीही शास्ती, केलेली जप्ती किंवा शिक्षा ;

(घ) असा कोणताही पूर्वोक्त अधिकार, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा यांच्या संबंधात करण्यात आलेले कोणतेही अन्वेषण, न्यायालयीन कार्यवाही किंवा उपाययोजना यांस बाध येणार नाही आणि जणू काही, हा अधिनियम संमत झाला नसल्याप्रमाणे असे कोणतेही अन्वेषण, न्यायालयीन कार्यवाही किंवा उपाययोजना चालू करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा लादता येईल :

परंतु आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकास अधीन राहून, अशा प्रकारे निरसित झालेल्या कोणत्याही अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (यात काढण्यात आलेल्या अधिसूचना, आदेश किंवा देण्यात आलेली प्रमाणपत्रे, करण्यात आलेल्या नेमणुका किंवा केलेले नियम यांचा समावेश होतो) ही, जोपर्यंत ती या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नाही तोवर, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये केली असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा कार्यवाहीद्वारे अधिक्रमित होत नाही तोपर्यंत आणि करण्यात आली नसेल तर, संबंधित क्षेत्रात तद्नुसार अंमलात असण्याचे चालू राहील.

## अनुसूची

[ कलम ३ (ङ) ]

गोजातीय प्राणी (वळू, बैल, म्हशी आणि म्हशीचे पारडे).

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.